# वसई-विरार शहर महानगरपालिका
# मुख्य कार्यालय, विरार
# ता.वसई, जि.पालघर

जा.क्र.वविशम/वाहन/ २०९/२०२४
दिनांक :- ०३/१०/२०२४

## जाहीर दरपत्रक

याव्दारे सर्व पुरवठादार, संस्था व व्यक्ती यांचे माहितीसाठी कळविण्यांत येते की, वसई विरार शहर महानगरपालिका अंतर्गत येणाऱ्या चिमाजी अप्पा क्रिडा मैदान येथे १ नग राईडऑन रोलर व १ नग ग्रास कटर मशीन खरेदी करणे व सदर मशीनींची ४ वर्षाकरिता देखभाल दुरुस्ती करणेकामी इच्छुक व्यक्ती, पुरवठादार व संस्था यांचेकडुन दि.०४/१०/२०२४ ते दि.१०/१०/२०२४ या कालावधीत दुपारी ३.०० वाजता बंद पाकीटातुन दरपत्रक (कोटेशन) महापालिकेच्या www.vvcmc.in या संकेत स्थळावर मागविण्यात येत आहेत. सदरची दरपत्रके मुख्यालय, वाहन विभागात सादर करण्यात यावी.

| अ.क्र. | मशीन तपशील | संख्या | मशीन व मशीनच्या ४ वर्षाकरिता देखभाल दुरुस्तीसह अंदाजपत्रकीय रक्कम | दरपत्रकाव्दारे मागविलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | **राईडऑन रोलर**<br>Engine : Petrol Engine १६३cc<br>Wheel size : Dia – ६०० mm x ८०० mm wide<br>Speed : ०-२Km/p<br>Starting system : self – start<br>Light : front led light<br>Forward & reverse | १ | ५,३०,०००/- | |
| २ | **ग्रास कटर मशीन**<br>Cutting Height : २mm to २२ mm<br>Engine : Four Stroke petrol १३३cc Engine.<br>Cutting Width : १८ “staring System : Rope Start Fuel consumption – ०.५L/Hr. | १ | | |

## अटी - शर्ती

१) पुरवठादाराने स्वत:चे लेटर पॅडवर दरपत्रक सादर करावे. दरपत्रकावर वस्तु व सेवा कर नोंदणी क्रमांक (GST) असणे बंधनकारक राहील.

२) मालकाचे/संस्थेचे पॅनकार्ड झेरॉक्स प्रत जोडण्यात यावे

३) दरपत्रक मुदतीमध्ये व वेळेमध्ये मुख्य कार्यालयातील वाहन विभाग, येथे सादर करणे बंधनकारक राहील.

४) दरपत्रकास मंजुरीची समज दिल्यानंतर कार्यालयात उपस्थित राहुन करारनामा करणे बंधनकारक राहील.

५) मुदतीत करारनामा न केल्यास दरपत्रक रद्द करण्यात येईल.

६) दरपत्रकात दर सादर करताना मुळ किंमत, वस्तु व सेवा कर (GST) व इतर सर्व करासहीत भरावयाचे आहेत.

७) मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार मा.उप. आयुक्त यांना राहील.

८) वरील अटीचे पालन जे पुरवठादार करणार नाहीत त्यांचे दरपत्रक पडताळणीअंती अपात्र ठरविण्यात येईल.

९) दरपत्रक सादर करताना लिफाफ्यामध्ये १०० रुपयाचे स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र (सोबत जोडलेले परिशिष्ठ "अ" नमुन्यानुसार) व (५) ५०० रुपयाचे स्टॅम्प पेपरवर घोषणापत्र (सोबत जोडलेले परिशिष्ठ "ब" नमुन्यानुसार) सादर करणे बंधनकारक आहे. प्रतिज्ञापत्र व घोषणापत्र नसल्यास दरपत्रक रद्द करण्यात येईल.

१०) यासंबंधीची दरपत्रके स्वत:चे लेटर पॅडवर बंद पाकीटातुन दि.१०/१०/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता मुख्य कार्यालय, विरार येथे सादर करावीत.

मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दि.१०/१०/२०२४ रोजी दु. ३.०१ वा. मा.उप.आयुक्त यांचे दालनात उपस्थित दरपत्रकदार अथवा त्यांचे प्रतिनिधी ह्यांचे समक्ष उघडण्यात येतील.

**स्थळ :- मुख्य कार्यालय, विरार**
**दिनांक :- ०३/१०/२०२४**

**सही/-**
**(नानासाहेब कामठे)**
**उप.आयुक्त (वाहन)**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

**<u>On १००/- Rupees stam paper</u>**

**<u>परिशिष्ट -अ</u>**

**प्रतिज्ञापत्र**

मी/ आम्ही याव्दारे असे नमुद करतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १० व कलम ११ तरतुदीच्या खाली उतंधृत केलेल्या आहेत. माहिती आहे आणि गंभीरपणे नमुद करतो की, महानगरपालिकेशी किंवा महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येणाऱ्या ई-निविदा/संविदेमध्ये महानगरपालिकेच्या कोणत्याही सेवकाचा तसेच सदस्याचा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध आमच्याशी नाही.

(कलम १० :- यापुढे तरतुद केली असेल त्या व्यतिरिक्त, महानगरपालिकेच्या आदेशावरुन केलेल्या कोणत्याही कामात किंवा, महानगरपालिकेशी किंवा अधिन किंवा महानगरपालिकेने किंवा महागनरपालिकेच्या वतीने कोणत्याही संविदेमध्ये जीचा स्वत:चा किंवा आपल्या भागिदारामार्फत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या कोणताही हिस्स किंवा हितसंबंध असेल.)

(कलम ११ :- पालिका सदस्य म्हणुन किंवा महानगरपालिकेच्या कोणत्याही समितीचा सदस्य म्हणुन ज्या कोणत्याही बाबतीत कलम १० व कलम ११ मध्ये वर्णन केल्याप्रमाणे त्याचा किंवा त्यांच्या भागीदारीचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रितीने कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल मग अश्या हिश्याची किंवा हितसंबंधाची किंमत काहीही असो, किंवा जीम ज्याचा अशीलाच्या, प्रकत्याचा किंवा इतर व्यक्ती च्या वतीने व्यवसायीकदृष्टया त्याचा हिस्सा किंवा हितसंबंध असेल अशा कोणत्याही बाबतीत मतदान करील.)

निविदाधारकाचे नाव :- निविदाधारकाची सही

पत्ता:-

दिनांक :-

साक्षीदाराचे नाव :- साक्षीदाराची सही

पत्ता :-

दिनांक :-

**<u>On ५००/- Rupees stam paper</u>**

**<u>परिशिष्ट -ब</u>**

**सत्यप्रतिज्ञापत्र (Affidavit)**

मी------------------------------ वय---------वर्ष राहणार----------------------------या सत्यप्रतिज्ञापत्राव्दारे लिहुन देतो की, मी------------------------------------------------या फॉर्मचा/कंपनीचा मालक असुन -------------------------------------या कामासाठी निविदा सादर करीत आहे. त्या निविदेच्या लिफाफा क्र. १ मध्ये कागदपत्रे सादर केली आहेत. ती खरी, बरोबर व पुर्ण आहेत त्यामध्ये कोणत्याही त्रुटी चुका नाहीत याची मी खात्री केलेली असुन असे शपथपुर्व खालील अटी व शर्ती सह मान्य करीत आहे. या कागदपत्रामध्ये काही चुकीची, दिशाभुल करणारी, खोटी व तसेच अपुर्ण माहीती आढळल्यास मी भारतीय दंडसहीता अंतर्गत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन.

..२..

१. जी कंत्राट कालावधी दरम्यान, मी माझ्या कार्यालयाने वाहन विभागाला खोटी/बनावट किंवा फसवी कागदपत्रे सादर केली असल्यास मी भारतीय दंडसहीता अंतर्गत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन.

२. जर कंत्राट कालावधी दरम्यान, आणि काम समाप्ती नंतर अंतिम देयक देण्याच्या सादर केलेले कोणतेही खोटी/बनावट किंवा फसवी आढळल्यास, मी भारतीय दंडसहीता अंतर्गत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन.

३. जर काम समाप्तीनंतर दोष दायीत्व कालावधी दरम्यान किंवा त्या नंतर कोणत्याही वेळी, कोणतीही माहिति किंवा कागदपत्रे खोटी/ बनावट, फसवी किंवा दिशाभुल करणारी आढळल्यास, मी भारतीय दंडसहीता अंतर्गत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन.

कंत्राटदाराची सही